॥ श्री जगदंबा केदारलिंग प्रसन्न ॥

नानिवडेकर शाहिरी संगम मालेचें पुष्प १ लें

# छत्रपति शिवाजी महाराज यांचा
# पो वा डा



दि. ९ एप्रिल १९५९ शिवजयंती वैशाख शु. ३ शके १८८१

कवि - महादेव नारायण नानिवडेकर ( किसरूळ )

आवृत्ति १ ली ] [ प्रति २०००

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—' नानिवडेकर शाहिरी संगम '
१/१८, गोरेगांवकर चाळ, मुंबई ४

किंमत ४ आणे

# नानिवडेकर शाहिरी संगम प्रकाशन-मालेच्या आश्रयदात्यांस—

पूर्वीं प्रकट केल्याप्रमाणें आज रोजीं वरील प्रकाशन-मालेचें प्रथम पुष्प '**छत्रपति-शिवाजी महाराजांचा पोवाडा**' हें प्रसिद्ध होत आहे हें कळविण्यास आम्हांस हर्ष होत आहे. शिवजन्मतिथीसंबंधानें एवढेंच सांगावयाचें कीं जरी त्या विषयावर विद्वानांत मतभेद असले तरी आम्हीं बहुजन-संमत तिथि ( फाल्गुन व. ३ शके १५५१ ) पोवाड्यांत स्वीकारिली आहे. पोवाडा मात्र सोयीसाठीं मुंबई सरकारनें स्वीकार केलेल्या शिवजन्मतिथीला ( वैशाख शु. ३ ) प्रकाशित करण्यांत येत आहे.

मालेचीं इतर पुष्पेंहि यथावकाश प्रसिद्ध होतील. आश्रयदात्यांनीं आमच्यावर सदोदित कृपालोभ ठेवून मालेच्या प्रसारासाठीं हातभार लावावा ही विनंति.

आपला,

मुंबई
दि. ९-४-१९५९

**वसंत शंकर नानिवडेकर**
व्यवस्थापक : "**नानिवडेकर शाहिरी संगम**"

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे अधिकार प्रकाशकांच्या स्वाधीन आहेत.


## शाहीर नानिवडेकरांच्या कार्यक्रमासाठीं

**भेटा वा लिहा:—**

व्यवस्थापक : **नानिवडेकर शाहिरी संगम,**

१/१८, गोरेगांवकर चाळ, गिरगांव,

मुंबई क्र. ४.

— ॐ —

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा

कवि—( शाहीर ) महादेव नारायण नानिवडेकर ( किसरूळ )

चौक १ ला :—

छत्रपती शिवाजी रणशूर । घेऊनि तलवार । मोंगल जर्जर । करुनि राखिला हिंदु धर्मास ।। स्थापियली स्वतंत्रता देशास । झळकला हिरा महाराष्ट्रास ।।धृ।।

भोजराजा माहित सकलांस । रजपूत वंश । त्याचा जो अंश । वाढला म्हणती भोंसला त्यास ।। त्याच कुळिं शहाजी आला जन्मास । पराक्रमी महान् वचक यवनांस ।। जी ।। धन्य वीर शहाजी भोंसला । पिता शोभला । शिवाजी राजाला । जिजाबाई माता जन्म देई ।। शिवनेरी किल्ल्याच्या ठायीं । किल्ला हा पुण्यानजिक हाई ।। जी ।। शके १५५१ स । फाल्गुन महिन्यास । वद्य तृतीयेस । शिवाजी रूपें शंकर अवतरला ।। सुटला थरकांप दुश्मानांला । घडा पापांचा त्यांचा भरला ।। जी ।। जसा बाळ शिवाजी वाढला । चंद्र भासला । जिजाऊ मातेला । बहुत शिकविल्या कला तिनं त्यास ।। सांगुन पूर्वजांचा शौर्य इतिहास । ओनामा वीरश्रीचा पढविला त्यास ।। जी ।। बाळ शिवाजी पुसी मातेला । सांग आई मला । सर्व माहितीला । यवन हा कोण आला कोठून ।। इथं कसा बसला राज्य घेऊन । आई मला सांग पहिल्यापासून ।। जी ।। आला खैबर खिंडींतून । सिंध जिंकून । पंजाबांतून । दिल्लीच्या लाल किल्ल्यावर ।। खड्ग फिरवुनी वारंवार । रक्ताचे वाहवले पूर ।। जी ।। तें मयूर सिंहासन । खुशाल भोगून । देश दख्खन । जिंकाया यवन येऊन भिडले ।। हिंदी वीरांचे मुडदे पडले । अखेर यवनांचें निशाण चढलें ।। जी ।।

( चाल ) शहाजहान् बादशहा होता तवा दिल्ली तक्ताला ।।
निजामशाही राज्य अहमदनगर मुलुखाला ।।
आदिलशाही मुसलमानी राज्य विजापूराला ।।
कुतुबशाही राज्य यवनांचं गोवळकोंड्याला ।।
साऱ्या हिंदुस्थानेभर मुसलमान पसरला ।।

सारी सत्ता मोंगलांची थारा न्हवता हिंदूला ॥
मानाच्या जागा मोठाल्या साऱ्या यवनांला ॥
शिपाईगिरी तेवढी हिंदूंच्या राहिली वांट्याला ॥
बाटवुनी करती मुसलमान गरीब रयतेला ॥
कापिती गायी चरचरा हामरस्त्यांला ॥
अबलांना कोणी रे वाली नाहीं राहीला ॥
हिंदुधर्म बुडाला जो तो बोलूं लागला ॥
हे शब्द ऐकूनी शिवाजी बाळ खवळला ॥
रागानं लाल तो झाला । डोळे फाडुन बघूं लागला ।
करकरा चावुनि ओंठाला । बोलला जिजाऊ मातेला ।
बोलुं नको पुन्हां कीं ग हिंदुधर्म लोपला ॥
कशी लढाई करायची आई शिकिव तूं मला ॥
देशाचा करिन उद्धार सांगतों तुला ॥
बारा वर्षं न्हवती झाली शिवाजीच्या उमरीला ॥
असा लहानपणांत लढाईचा ओनामा घेतला ॥
भाला विटा तीरकमटा निशाणबाजी शिकला ॥
ढाल पट्टा फिरंगीचे वार फिरवूं लागला ॥
घोड्यावरतं बसुन भरधांव दौडूं लागला ॥
खडान् खडा देशाची माहिती घेऊं लागला ॥
कोणकोणते किल्ले आणि शहरं हायत मुलखाला ॥

( चाल )

दादोजी कोंडदेवानं । जिजाऊ मातेनं । दिलं शिक्षण । शिकविला भूगोल आणि इतिहास ॥ ( भारताचा भूगोल आणि इतिहास ) वर्म समजला शिवाजी खास । धरला मनिं स्वातंत्र्याचा ध्यास ॥ जी ॥

चाक २ रा :—

खेळगडी मित्र जमविले । तान्हाजी भले । येसाजी आले । आले बाजी पासलकर दोस्त ॥ स्वराज्याचा ध्यास अहोरात । शपथा घेती रोहिडेश्वरापुढतं ॥ जी ॥

मग आपुल्या जहागीरींत । ( पुण्याच्या मुलखांत ) करुनी बंदोबस्त । लावितो शिस्त । सद्‌गुणी बाळ जिजाईचा ।। सुपुत्र शहाजी राजाचा । चेला दादोजी कोंडदेवाचा ।। जी ।। गेली कळ विजापूराला । बादशाह लाल झाला । हुकूम काय केला । बोलावून शहाजी राजाला ।। ताकीद द्या तुमच्या शिवाजीला । नाहींतर आणा दरबाराला ।। जी ।। जिजामाता घेऊन बरोबर । घोड्यावर स्वार । गांठी विजापूर । शिवाजी बाळ मोठ्या जल्दीनं ।। वंदुनिया बापाचे चरण । कांहो म्हणी केलं बोलावणं ।। जी ।। बापाचा हात हिसडून । गेला धांवून । तलवार उगारून । कसाबाचा हात कलम केला ।। गाईचा प्राण वाचवीला । विजापूर वेशीच्या रस्त्याला ।। जी ।।

( चाल )

आला बादशाहाच्या दरबाराला । नाहीं त्यानं कुर्नीसात केला । नाहीं त्यानं लवुन मुजरा केला । राग भारी चढला बादशाहाला । आज्ञा करी बादशाहा शहाजीला । रीत नाहीं तुमच्या ह्या मुलग्याला । दरबाराची शिस्त शिकवा त्याला । बाप मग बोलतो शिवाजीला । ऐक बाळा गोष्ट सांगतों तुजला । लवून कर मुजरा बादशाहाला । अन्न देणारे हेच आम्हांला । आईबाप बादशाहाच आपुणांला । मान द्यावा अन्न देणाऱ्याला ।। दरबारांत दादा ।।

बापाला शिवाजी बोलला । ऐका समयाला । नमीन म्हणी भवानी शंकराला । नमीन एक माता न्‌ पितयाला । सद्‌गुरु गोमाता ब्राह्मणांला नाहीं नमणार मोंगलाला । अपमान नाहीं सहन व्हायचा मजला । यायचा नाहीं यापुढं दरबाराला । पाय नाहीं ठेवायचा विजापूरला । निरोप बापाचा घेऊनि निघाला । जिजाबाई घेतली संगतीला । थेट आला पुण्याच्या शहराला । करतो प्रार्थना भवानीला हो ।। भक्तीनं दादा ।।

( चाल )

जय भवानी म्हणी सत्वर । प्रसन्न मजवर । होउनि दे वर । सोडीव बंदिवान्‌ हिंदुबांधवांस ।। देऊनि जीवदान गाईब्राम्हणांस । जगवि सनातन हिंदुधर्मास ।। जी ।।

**चौक ३ रा:—**

**शिवाजीचा निर्धार पुरा ठरला । भोंसले वंशाला । ( रजपूत वंशाला ) झालों मी जन्माला । करिन सार्थक खरा पुरुषार्थ ॥ स्वतःच्या कमाईचा घांस खाण्यांत । नाहीं परक्यांची हांजी करण्यांत ॥ जी ॥**

तोरणा गडावर स्वातंत्र्याचें बांधुनी तोरण ॥
फडकविला झेंडा शिवाजीनं ॥ जी ॥
वाई जवळचा मुलुख जावळी घेतला जिंकून ।
प्रतापगड बांधला नवीन ॥ जी ॥
मावळे शेतकरी वीर जमविले गोष्टी बोलून ।
तलवारी बक्षीस देऊन ॥ जी ॥
सैन्य उभारलं हां हां म्हणतां शिवाजी राजानं ।
सर्वदा भवानी प्रसन्न ॥ जी ॥
किल्ला बांधतां पाया खणतां सांपडलं धन ।
लक्ष्मी झाली प्रसन्न ॥ जी ॥
स्वातंत्र्याचं शिंग गर्जलें सह्याद्रीमधुन ।
बादशहा झाला बेभान ॥ जी ॥

विजापूरच्या आदिलशहाला । संशय असा आला । शिवाजी राजाला । असावा बाप शहाजी फूस देणार ॥ शिक्षा शहाजीला बादशहा देणार । भिंतीमध्यें चिणून ठार करणार ॥ जी ॥

ही बातमी कळली शिवाजीला । उपाय योजला । बाप मुक्त केला । दिल्लीपति दोस्त केला समयास ॥ परस्पर धमकी आदिलशाहास । शहाजीला सोडणं भाग झालं त्यास ॥ जी ॥

मुत्सद्दी शिवाजी खरोखर । कार्य संपल्यावर । बादशहाबरोबर । शत्रु समजुनी जपुनि वागणार ॥ सांवधपणें पावलं टाकणार । दोघांशीं एकला टक्कर देणार ॥ जी ॥

शिवाजीचा कांटा काढाया । दोन्ही बादशाह्या । करिती कारवाया । शिवाजी

फसला नाहीं कवणांस ॥ गीतेचा मनन केला अभ्यास । ठोशासी ठोसा देणं समयास ॥ जी ॥

——०*०——

**चौक ४ थाः—**

पैजेचा विडा उचलून । मोठ्या तोऱ्यानं । आफझलखान । निघाला विजापुराहून ॥ शिवाजीला आणतों मी पकडून । बरळला खान शेंफारून ॥ जी ॥

शिवाजी तो उंदीर डोंगराचा । मराठी बच्चा । नेम काय त्याचा । कदाचित घेईल अपुला प्राण ॥ संगें वीस हजार सैन्य घेऊन । निघाला मोठ्या तय्यारीनं ॥ जी ॥

तुळजापुराला धडक मारिली । भवानी भरडली । जाळ पोळ केली । प्रळय मांडला पंढरपुराला ॥ प्रजा केली हैराण रस्त्याला । येऊन धडकला प्रतापगडाला ॥ जी ॥

खानाला चढली बेफाम धुंदी बरळला ॥
मेला देव हिंदूंचा धर्म त्यांचा संपला ॥
किती मूर्ख हिंदु हे देव म्हणती दगडाला ॥
दाढीवरनं हात फिरवीत डुलाय लागला ॥
दगडांत देव तवां खचित न्हवता राहिलेला ॥
तो गेला होता कुठं ऐका सांगतों तुम्हांला ॥
संचरून अंगामध्यें शिवाजीच्या प्रगटला ॥
कर तुकडे तुकडे खानाचे । कापून आण शिर त्याचें ।
भिऊं नको सहाय्य हाय आमुचें ।
तुळजापुरची भवानी नी विठोबा बोलूं लागला ॥ कृष्णाजीपंत

खान प्रतापगडासी आला । वर्दी शिवाजीला । यावं भेटीला । ~~गोपीनाथपंत~~ वकील धाडून ॥ शिवाजीनं बांका वकुत वळखून । बहाणा समेटाचा दिला पटवून ॥ जी ॥

प्रतापगडाच्या पायथ्याखालीं । भेट ठरविली । तयारी करविली । शामियाना खास उभारून ॥ मोत्याच्या झालरी लावून । शृंगारिला तंबू शिवाजीनं ॥जी॥

पंतजी गोपीनाथ
~~कृष्णाजी भास्कर~~ भला । वकील आपुला । धाडुनी दिला । खानाला पुरता फसवायाला ॥ शिवाजी बघा तुम्हांस लै भ्याला । द्यावं जीवदान शिवाजीला ॥जी॥

भवानीनं स्वप्नीं येऊन । केलें वरदान । सावध रे पूर्ण । भेटीमधीं दगा करील रे खान ॥ वर्म त्याचें पुरतें ओळखून । भेटीला जा रे हुषारीनं ॥ जी ॥

भवानीचं होता वरदान शिवबा हर्षला ॥
जाळीदार चिलखत साऱ्या आंगभर ल्याला ॥
त्याच्यावरनं लांब भरजरी झगा चढविला ॥
पोलादाचं शिरस्त्राण वरून फेटा बांधला ॥
वाघनखं पोलादी धरिलीं डाव्या पंज्याला ॥
लटकावली भवानी तलवार डाव्या कमरेला ॥

भवानीचं घेतलं दर्शन । जिजा आईला केलं वंदन ।
आशीर्वाद त्यांचा मिळवून । शिवराय चालले निकडीनं ।

जिवा महाला संभाजी कावजी वीर संगतीला ॥
अफझुलखानाच्या समोर येऊन ठाकला ॥
खान घाली झेंप शिवाजीला धरून मारण्याला ॥
जणुं घालावी झेंप पतंगानं प्रखर ज्योतीला ॥
शरीरानं खान धिप्पाड शिवाजी धाकला ॥
शिवाजीच्या दसपटीचं बळ होतं खानाला ॥
उंदरासारखा टाकीन चिरडून म्हणतो शिवाजीला ॥
धरून मुंडकं शिवाजीचं काखेत चिरडूं लागला ॥
शिवाजीच्या बरगडींत कट्यार भोसकूं लागला ॥
त्याच्या बाचं बारसं होता शिवाजी वीर जेवलेला ॥

चिलखत मजबूत अंगाला । कट्यारीनं दगा नाहीं केला ।
खर्र खर्र आवाज वरच्यावर झाला । शिवाजीनं विचार मनिं केला ।
शुभ शकुन खानानं केला ।

आतां करूंया म्हणी डावासी डाव आपुला ॥
वाघनखं भोसकून खानाचा कोथळा फाडला ॥

आंतड्याचा गोळा पोटातनं बाहेर काढला ॥
खान अल्ला अल्ला बोलला । तोबा तोबा तोबा बोलला ।
दगा दगा ओरडूं लागला ।
त्याबरोबर सैय्यद् बंडा धांवुनिया आला ॥
शिवाजीच्या शिरावर पट्टा त्यानं उगारला ॥
हां हां म्हणतां जिवा महाला आडवा त्याला भिडला ॥
पट्टयाचा वरच्यावर वार त्यानं तोडला ॥
खानाला शिवाजीनं पुरता खालीं पाडला ॥
होता जिवा म्हणुनि कीं हो शिवा वाचला आपुला ॥

तोफांचे बार उडविले । सैन्य लढविलें । दडवुन ठेवलेलें । रानोमाळ पाटन्व रक्ताचे ॥ विजयी तें सैन्य मराठ्यांचें । वंदिती पाय शिवाजीचे ॥ जी ॥

प्रतापगडीं भवानी म्होरं । खानाचं शिर । वाहुन सत्वर । जिजाबाई चरणीं लीन झाला ॥ मातोश्री ओंवाळी त्याला । पाणी दोघांच्या नयनांला ॥ जी ॥

आल्या खवळुन शाह्या दोन्ही । खड्ग परजुनी । सूड गर्जुनी । शिवाजीचा पूर्ण कराया नाश ॥ शिवाजी पुरुन उरला उभयांस । रम्य तो भाग पुढल्या चौकास ॥ जी ॥

—०—

**चौक ५ वाः—**

( चाल )

एकाहुनि एक शिवरायाचे प्रतापी सरदार ।
स्वातंत्र्याच्या मानकऱ्यांचा करूं या जैकार ॥ धृ० ॥
पन्हाळगडला वेढा घालितो शिद्दी जोहार ।
त्यांतून जातो निसटुन अमुचा शिवबा रणशूर ॥
विशाळगडची खिंड रोखितो बाजी सरदार ।
अगणित शत्रूसंगें एकला टक्कर देणार ॥
शिवराय गडावर गेले । सुखरूप जाऊन पोंचले ।
तोफांचे बार ऐकले । बाजीनें प्राण सोडीले ।
घोडखिंडीमधीं अजून घुमतो बाजी सरदार ॥ स्वातंत्र्याच्या० ॥

अफाट सेना शाहिस्त्यानें आणली पुण्यावर ।
त्याचीं बोटें छाटुन त्याला पळवियला दूर ॥

भेटीसाठीं आग्रा शहरीं शिवबा जाणार ।
दगा करोनी बादशहा त्याला अटक करणार ॥

हिंमत धरूनी मोठी । कपटासी बनला कपटी ।
किती वर्णाव्या त्या गोष्टी ।

पेटाऱ्यामधिं बसुन निसटला शिवाजी बाहेर ।
बैराग्याच्या वेशें आला रायगडावर ॥ जी ॥

माझ्या शिवबा ये रे झडकरी भेट मला देई ।
आरती आणिते ओंवाळीते म्हणे जिजाबाई ॥

नयनांमधुनीं टप् टप् अश्रू ओघळती मोती ।
आरती भरली स्वातंत्र्याची कांठोकांठ पुरती ॥
सत्यापाठीं भवानी माता सदैव असणार ॥ स्वातंत्र्याच्या० ॥

पुरंदरावर मुरारबाजी कमाल करणार ।
शिरावांचुनी धड झुंजलें अजब चमत्कार ॥

मध्य रात्रीला कोंडाण्यावर घोरपड लावणार ।
निधड्या छातीचा तानाजी तो चढला कड्यावर ॥

येसाजी हाडकुळा दिसला । परि हत्तीसंगें लढला ।
हत्तीनें मोर्चा फिरवीला । येसाजीनें पट्टा धरिला ।
एक्या वारामधीं सोंड हत्तीची चिरी आरपार ॥ स्वातंत्र्याच्या० ॥

पवाडा गातां रंगुनि जातो नानिवडेकर ।
महाराष्ट्राचा तुमचा लाडका महादेव शाहीर ॥

वीर रसाचीं गाणीं मर्दाविण कुणास कळणार ।
चुकी भूलीला क्षमा असावी करतों नमस्कार ॥

( चाल )

अशापरी यवनांची दिली झुगारून सत्ता शिवाजीनं ॥
तीस वर्षं अहोरात्र खपून स्वतंत्रता मिळवून ॥
रायगड किल्ला राज्याभिषेकाला योग्य ठिकाण पाहून ।
ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी उत्तम मुहूर्त काढला शोधून ॥
सिंहासनारूढ झाले छत्रपति शिवाजी धन्य तो दिन ।

## —: शके १५९६ सालीं हें अपूर्व राज्यारोहण :—

स्वातंत्र्य पूर्ण मिळवून । शिवाजी विनयानं । करी वंदन । जिजाऊ मातेच्या चरणांस ॥ अश्रूंच्या धारा त्यांच्या नेत्रांस । रायगडीं घडला सत्य इतिहास ॥ जी ॥

स्वातंत्र्यवीर शोभला । भारतीं भला । तोड नाहीं ज्याला । रक्षी जो देव देश धर्मास ॥ ब्रीद गो-ब्राह्मण पालक खास । झळकला हिरा महाराष्ट्रास ॥ जी ॥

परस्त्रीस मानितो माता । भगवद् गीता । धरुनिया हातां । शरीरसंपदा देशकार्यास ॥ सज्ज ठोशांस ठोसा देण्यास । झळकला हिरा महाराष्ट्रास ॥ जी ॥

शिवाजी तो शिवाजीच खरा । कोहिनूर हिरा । झळकला तुरा । मराठी जरिपटका मुलखांस ॥ डंका गर्जला चारी खंडास ॥ झळकला हिरा महाराष्ट्रास ॥ जी ॥

दर्यांत दुर्ग बांधिले । कोट उभविले । खड्ग फिरविलें । क्षणामधिं केला रिपूंचा नाश ॥ महादेव गातो त्याच्या कवनास । झळकला हिरा महाराष्ट्रास ॥ जी ॥

श्रोत्यांनो पोवाडा ऐकूनीं । जाल परतुनी । मर्म घ्या ध्यानीं । क्षात्रतेजाचा धरा हव्यास ॥ जन्मु द्या शिवाजी अजि समयास । झळकुं द्या हिरा महाराष्ट्रास ॥जी॥

महादेव तुमचा शाहीर । नानिवडेकर । कवन करणार । किसरूळ गांवीं जन्मला खास ॥ ठिकाण हें कोल्हापूर जिल्ह्यास । झळकला हिरा महाराष्ट्रास ॥ जी ॥

—: समाप्त :—

# —: आमचीं पुढील प्रकाशनें त्वरित निघणार :—

**: पोवाडे :**

**शाहीर नानिवडेकर कृत**

१ महात्मा फुले
२ झांशीची राणी
३ तात्या टोपे
४ लो. टिळक
५ देशाची कहाणी
६ मुधारणेची दिशाभूल
७ अहिल्याबाई होळकर



शाहीर सोबत पुत्र नंदा

८ कटाव-चुटके-फटके
९ लावण्या व वग
१० विनोदी नकला
११ विकास गीतें
१२ बार्डोली सत्याग्रह पोवाडा
१३ व्यायामाचा पोवाडा
१४ उद्योगमहर्षि ओगले व किर्लोस्कर यांचे पोवाडे
१५ अनंतफंदीचा वग ( मुंबई आकाशवाणीवर गायलेला )
१६ आत्मरक्षणाची लाठी लढंत कला व बंदेश
१७ पाण्यांत सूर कोलांट्या मारण्याची कला ( सचित्र )
१८ शाहीर टोसरकृत सिंहगडाचा पोवाडा व लावण्या
१९ शाहीर नानिवडेकरांचें आत्मचरित्र

---

## नानिवडेकर शाहीरी संगम प्रकाशन मालेच्या आश्रयदात्यांना कळकळीची विनंति :-

आमच्या प्रकाशन कार्याला सढळ हातानें उदार देणग्या देऊन उपकृत करा. वार्षिक सामान्य सभासदत्वाची वर्गणी केवळ १ रुपया आजच भरून प्रकाशनाचा प्रसार वाढवा. सर्व पुस्तकें घरपोंच करूं.

**पत्ता:**— व्यवस्थापक, **नानिवडेकर शाहिरी संगम,**
१/१८, गोरेगांवकर चाळ, गिरगांव, मुंबई ४

---

मुद्रक :— **ग. द. पराडकर,**
**आनंद मुद्रणालय,** ६, मुगभाट स्ट्रीट, मुंबई ४.
प्रकाशक:—**रघुनाथ नारायण महाजन,** नानिवडेकर शाहिरी संगम,
१/१८, गोरेगांवकर चाळ, गिरगांव, मुंबई ४.

॥ राष्ट्रदेवो भव ॥



राष्ट्रशाहीर कै. म. ना. नानिवडेकर

# पुरुषार्थाचे पोवाडे

36

मूल्य २ रुपये